|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)
Umavinagar, Jalgaon - 425 001, (M.S.) INDIA

## Research Section

**परिपत्रक क्र. ०६/२०२४**

**विषय :- कबचौउमविशी संलग्नीत महाविद्यालयात संबंधीत विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रमास संलग्नीकरण /नुतनीकरण केलेले त्याच महाविद्यालयात संबंधीत विषयात Post Graduate Centerला नव्याने मान्यता द्यावी/ नुतनीकरणास मान्यता बाबत.**

**संदर्भ** :- मा. विद्या परीषदचा ठराव क्र. वि.प.ए-२७/२०२४,दि.१५/०३/२०२४

वरील संदर्भीय मा. विद्या परीषद ठराव क्र. वि. प. ए-२७/२०२४, दि.१५/०३/२०२४ अन्वये विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात संबंधीत विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रमास संलग्नीकरण/नुतनीकरण केलेले असेल त्याच महाविद्यालयात संबंधीत विषयात Post Graduate Reserch Center ला नव्याने मान्यता द्यावी/नुतनीकरणास मान्यतेबाबत मा. अधिष्ठाता मंडळाचा ठराव क्र. बी. ओ. डी. ए-०३/२०२४, दि.१९/०१/२०२४ मध्ये नमूद केलेल्या शिफारशींच्या अधिन राहून दुरुस्तीसह मान्यता द्यावी, असा ठराव खालीलप्रमाणे पारीत केला आहे.

**सदर ठरावाच्या अनुषंगाने :-**

१. विद्यापीठाशी ज्या संलग्नित महाविद्यालयांनी संबंधीत विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रमास संलग्नीकरण नुतनीकरण केलेले असेल त्याच महाविद्यालयास संबंधीत विषयात Post Graduate Reserch Center ला नव्याने मान्यता / नुतनीकरणास मान्यता देण्यात येईल.

२. ज्या महाविद्यालयात संबंधीत विषयात पदवीपर्यतच अभ्यासक्रम आहे, मात्र त्या विषयासाठी सदर महाविद्यालयास यापूर्वी Reserch Center म्हणून मान्यता दिलेले आहे पण त्या विषयात संबंधीत महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध नाही अश्या महाविद्यालयातील संशोधक मार्गदर्शकांना यापुढे मार्गदर्शक म्हणून नव्याने विद्यार्थी घेता येणार नाही. व सध्यस्थितीत त्यांच्या मार्गदर्शनाखाली ज्या विद्यार्थ्यांना Provisional Letter दिले आहे अश्या विद्यार्थ्यांना, त्यांनी त्यांच्या विषयात ज्या पदव्युत्तर महाविद्यायात पदव्युत्तर संशोधन केंद्रास मान्यता आहे. अश्या महाविद्यालयातील मान्यता प्राप्त मार्गदर्शकांपैकी एक सह-मार्गदर्शक घेणे आवश्यक राहील. मात्र ज्या महाविद्यालयात संबंधीत विषयात पदवीपर्यतच अभ्यासक्रम आहे, मात्र त्या विषयासाठी सदर महाविद्यालयास यापूर्वी Reserch Center म्हणून मान्यता दिलेले आहे अश्या Research Center च्या नुतनीकरणास जोपर्यत त्यांच्या मार्गदर्शकांखाली कायम प्रवेशित संशोधक विद्यार्थी असेल तोपर्यतच सुरु असणे आवश्यक असल्याने आवश्यक ते शुल्क आकारुन नुतनीकरणास मान्यता देण्यात येईल.

३. वरील २ नुसार ज्या महाविद्यालयास संबंधीत विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे संलग्नीकरण असेल व त्या विषयाच्या संशोधन केंद्रास मान्यता असेल अशा महाविद्यालयातील मान्यता प्राप्त मार्गदर्शकांना खास बाब म्हणून जास्तीत जास्त ४ विद्यार्थ्यांना सह-मार्गदर्शक म्हणून विद्यार्थी घेता येतील, मात्र ही सुविधा फक्त पेट-२०२३ च्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

तरी सर्व संबंधीत संशोधक विद्यार्थी, मार्गदर्शक, मा. प्राचार्य यांनी वरीलप्रमाणे नोंद घेवून पुढील कार्यवाही करावी. यांची सर्वांनी कृपया नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

जा. क्र. : कबचौउमवि/११/पीएचडी/पदव्युत्तर सेंटर/७८४/२०२४
दि. २९/०४/२०२४

(प्रा. एस. टी. इंगळे)
**प्र-कुलगुरु**

**प्रति,**

१) कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक.

२) मा. संचालक/विभागप्रमुख, विद्यापीठातील सर्व प्रशाळा/विभाग,कबचौउमवि,जळगाव.

**प्रत माहितीसाठी :-**

१) मा. कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगाव

२) सर्व विद्याशाखेचे मा.अधिष्ठाता,कबचौउमवि,जळगाव

(O) : 0257-2258409
(O) : 0257-2257224 & 284
Fax : (91)-0257-2258403 & 2258406
Website : www.nmu.ac.in
E-mail : pvcresearch@nmu.ac.in